## II) ज्ञानेश्वरांच्या संकल्पानुसार मानवी विकास आणि स्वतंत्र भारताची प्रगति

ज्ञानेश्वरांनी "आता विश्वात्मके देवे" चा संकल्प विश्वरचनेतून मानवाचा विकास साधण्यासाठी केला. पसायदान हा बदलत्या विश्वरचनेसाठी संकल्प होता. सजीवांच्या आत्मिक विकासासाठी असणारा हा संकल्प Material Development व जड तत्त्वाच्या विकासाविना जणू अपुराच राहणार होता. विश्वातील सर्वच सजीवांना विकासाची अंतरंग ओढ असणार आहे. जडतत्त्वाचा विकास–मानवाचा विकास घडवील व त्यातूनच विश्वमानवाच्या आत्मिक उत्थापनाचा मार्ग सापडेल, असा विचार होऊ लागला.

**"दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सुर्ये पाहो ।। जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।।"**

दुरिताचे अज्ञान–दारिद्रय–अंधकार दूर व्हायचा तर त्यांचा उन्नतीचा मार्ग कष्ट व धडपड यातूनच जाणार, तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या जगाची उभारणी होणार ! यासाठी अनंतकाळ पृथ्वीच्या उदरात वाट पाहणारी खनिज संपत्ती विकासाच्या वाटा शोधीत होती. त्यांना युरोप–ब्रिटनमधील पुनरूज्जीवनवादी चळवळीतून उद्गाते भेटले.

जगभर, जमिनीवर, जमिनीत, समुद्रावर, बर्फाळ प्रदेशात, डोंगरात, जंगलात व हवेत संचार करून जगातील अनेक सत्यांचा उलगडा करण्याचा ध्यास घेऊन, अहो रात्र काम करून, निरीक्षण करून, वर्षानुवर्षे सिध्दान्त मांडण्याच्या धडपडीत असलेल्या या शास्त्राला साहसी व "काही तरी नवे करु" असे म्हणणाचा वेड्यांच्या धडपडीतून, शास्त्र चिकित्सा करणारा एक समुदाय कार्यरत होता. तर त्याच बरोबर मेकॅनिक अगर कामगार हा सुध्दा जागरूकतेने नवनिर्मितीच्या शोधात राहिला.

आधी इंजिने बनवली. त्याच्या मागोमाग तंत्र विकास व त्या पाठोपाठ शास्त्र चिकित्सा अशी विकासाची गाठी हळूहळू आकार घेऊ लागली. शास्त्रीय तत्त्वांच्या शोधात उपयोगी कामांचे कोदण मिळाले. शास्त्र–तत्त्व–चिकित्सा नंतर लागू पडली. ओबड धोबड यंत्रे सुरचना धारण करू लागली. सुप्त खनिजे जमिनीतून वर आली. भट्टीत, मुशीत भाजून लखलखीत धातू बनले, त्यासाठी आवश्यक रसायनशास्त्र आणि भौतिकाचा विकास उपयोगाच्या शोधात होते त्यांना आवश्यक अशी Material आणि technical Development आणि Process Development आकार घेऊ लागली.

कापसाच्या धाग्यानंतर, रासायनिक धागे, कातडे, धातू, रसायने यांची जणू विकासासाठी शर्यत लागली. या सर्वांमागे ज्ञानेश्वरांचा, संत महंतांचा, विश्वविकासासाठीचा संकल्प होता. ती कार्यशक्ती Material Process Development – Hardware Development साठी युरोप–ब्रिटनच्या भूमीवर विकासाची वाट शोधत होती.

ज्ञानेश्वरांना "हे विश्वची माझे घर" असे असल्याने, त्या त्या कामास योग्य अशी भूमि–भूमिकांची निवड त्यांनी केली, आणि त्यामध्ये आपण हिंदुस्थानी लोक परकीय आक्रमणाखाली चिरडून निघताना – शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांनी स्वत्व – स्वाभिमान – स्वावंलबन – स्वराष्ट्र यांची प्रेरणा देऊन नव समाज निर्मितीचा ध्यास घेतला. आत्मिक विकास केवळ पुरेसा नाही. तर व्यक्ती–समाज व राष्ट्र विकास सुध्दा साधावयास हवा, हे स्पष्ट झाले.

या सर्व प्रक्रियेत सामाजिक समरसता संतांच्या कार्याने आणली. शिवाजी महाराज–बाजीराव पेशवा या सारख्यांनी स्वराष्ट्र निर्मितीचा मार्ग दाखवला.

म्हणजे अजून आपल्या भारत भूमीवर Material Development –Technology Development करण्यास योग्य काळ आला नव्हता.

ती अनुकूलता या "जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे" या जीवनप्रेमी व Material विकास प्रेमी युरोपीय ब्रिटिश समाजाची निवड ज्ञानदेवांच्या संकल्पाने केली. अशा साहसी, कष्टाळू, युरोपीय व ब्रिटिश संशोधकानी जग धुंडाळले, अवघी पृथ्वी पालथी घातली. सर्वत्र संचार करून इ.स. १४००–१८००–१९०० या काळात उत्साही, साहसी लोकांनी Material खनिजे भूगभर्गातून अक्षरश: पिंजून काढली. यंत्र–तंत्र विकास For Material Development आणि त्यातून पुढे Product Development साधला. कारण "**जो जे वांछिल । तो ते लाहो । प्राणिजात ।।**" हा ज्ञानदेवांचा संकल्प युरोप–अमेरिकेच्या भूमीवर जवळ जवळ ५०० वर्षे आकार घेत होता.

महात्मे, महापुरूषांच्या संकल्पातून जग आकार घेत जाते. तसे हुंकार समाजात उठतात, आणि त्यांच्या संकल्पाला सत्स्वरूप देण्यासाठी विविध दिशा, क्षेत्र यामधे बदल घडवून आणतात आणि तो ही मानवी प्रयत्नातून ! शेकडो वर्षांच्या धडपडीतून आज दिसणारे Material Development – Product Development चे स्वरूप दिव्यत्त्वाचा साक्षात्कार घडविते.

जड तत्त्वाच्या संपूर्ण जगभरातील सहभागातून त्यांना घडविण्याच्या तंत्र–शास्त्र–विकासातून नवीन सृष्टीच साकारली जणू ! आधी साकारले तंत्र आणि मग शास्त्राने त्यातील मंत्र शोधावा व पुढे तंत्र–शास्त्राचा पध्दतशीर जाणीवपूर्वक उगयोग व्हायला १३–१४ व्या शतकापासून १९–२० वे शतक उजाडले. १४ व्या शतकापासून ते २० व्या शतकापर्यंत ६०० वर्षांच्या या काळात जगातील सर्व आश्चर्ये जणू मूर्त रूप झाली. महाकाय Struetures उभारली गेली, आकाशाला गवसणी घातली, सागराला ढवळून काढले, भूगर्भात शिरून काय काय मिळवले नाही ? बर्फ, पाणी, आकाश, सर्वत्र धाडसाने कुतूहलाने संचार करण्याची उमेद राखून अनंत ठिकाणी लाखो हात राबले. रक्त, अश्रू, घाम गाळले आणि एक नवीन दृष्य जग साकारले.

“**जो जे वांछिल । तो ते लाहो । प्राणिजात ।।**” हा संकल्प युरोप, अमेरिकेच्या भूमिवर साकारला. त्या समाजाचा पिंड विकासाला अनुकूल होता.

म्हणूनच जणू त्यांनी या श्रमयज्ञात, विज्ञान–यज्ञात सहभाग निर्माण करून “माया” तत्त्वातून प्रतिसृष्टी निर्मिती करून दाखवली.

दरम्यानच्या काळात भारतात परकीय आक्रमकांच्या विळख्यातून देश सोडविण्याचा स्वाभिमान, राष्ट्र प्रेम जागवून स्वराज्य निर्मितीचा चमत्कार श्रीशिवरायांनी करून दाखविला. या वृत्तींचा भारतभर प्रसार होण्यास पुढील तीनशे वर्षे लागली. दरम्यान शिवरायानंतर बाजीराव पेशवे व त्यांचे सरदार यानी उत्तर हिंदुस्थानात परकीयांना जरब बसविली. परंतु औद्योगिक क्रांतीच्या जोरावर प्रबळ झालेल्या इंग्रजांनी देश व्यापला व भारत पुनः गुलामगिरीत लोटला गेला. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात कित्येक आहुती पडल्या व पुढे दीडशे वर्षे पुन्हा निद्रिस्त, पराभूत समाजाला स्वदेश, स्वाभिमान यांची प्रेरणा देण्यास टिळक, गांधी, सावरकर, नेहरू असे अनेक राष्ट्र पुरूष आणि क्रांतिकारक वीर यांनी स्वातंत्र्याची ज्योत पेटवून भारतभर समाज जागृति केली, आणि १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. जवळजवळ हजार वर्षांच्या काळात परकीय आक्रमक राज्यकर्तांच्या गुलामगिरीत समाज जणू निद्रिस्त होता. परंतु परिवर्तनवादी, क्रियाशील उपक्रमवादी तरूणांनी वेळोवेळी चळवळी उभ्या केल्या. उठाव केले, क्रांति कार्यात आपली जीवन पुष्पांची आहुती दिली. सर्वसाधारण समाज पांगळ्या, आंधळ्या अवस्थेत राहिला पण ४–५ टक्के असलेल्या उपक्रमशील कार्यकर्त्यांनी समाज परिवर्तन घडवून आणले. पानिपतच्या युध्दानंतर, १८५७ च्या क्रांति युध्दानंतर, सुमारे शंभर वर्षानंतर हरलेला भारत पुन्हा नवीन

प्रेरणा, उत्साह घेऊन उभा राहिला. विशेषतः ब्रिटिश राज्यकाळात आपला देश वारंवार परकीयांच्या जोखडाखाली कसा जातो ? याची चिंता करून अभ्यासपूर्ण नजरेने ब्रिटिश, युरोपियन समाजाच्या प्रगतीचा मागोवा घेणारे अनेक विद्वान, शास्त्रज्ञ, समाजसुधारक गेल्या १०० वर्षात होऊन गेले. त्यांनी आधुनिक भारताच्या नवनिर्मितीचा पाया अनेक क्षेत्रात घातला. विशेषतः १९१४ साली भारताच्या गुलामगिरीचा मूलभूत शोध घेऊन महामना केशव बळीराम हेडगेवार यांनी या निद्रिस्त समाजाला कायमची जागृति आणण्याच्या दृष्टीतून संघ विचाराची जोड देऊन "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ" निर्मिति केली. स्वदेश, स्वभाषा, स्वाभिमान यांची जागृति करण्यासाठी देशभर लाखो स्वयंसेवकांची साखळी उभी केली. राष्ट्रीय वृत्तीच्या नवविचारांची प्रेरणा सार्वत्रिक करण्यासाठी संघाच्या विचारसरणीचा प्रभाव मोठा आहे. विशेषतः स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्व क्षेत्रात पुनर्निर्माणाच्या प्रक्रियेला जोर देण्यास संघ कार्यकर्त्यांच्या "स्वयंसेवक" भूमिकेचा मोठाच हातभार लागला.

१९४७ ला स्वातंत्र्य भारताला मिळाल्यानंतर तरूणांना देश घडविण्याचे आव्हान होते. नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा वापरून, विविध क्षेत्रात, नेतृत्त्व देणे आवश्यक होते, अभियांत्रिकी क्षेत्र खुणावणारे होते, "हम भी कुछ कम नहीं" ''we will not remain Second / Third grade citizens in this world.'' हे दाखविण्यासाठी तरूणामध्ये आंतरिक उमंग होती.

कित्येक वर्षे दबलेला, गुदमरलेला समाज जागृत होऊन नवनवोन्मेष शालिनी प्रतिभा जागृत होऊन सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, औद्योगिक, वैद्यकीय, व्यापार, दळणवळण, विदेश–संचार अशा विविध क्षेत्रात प्रगतीचे नवे आदर्श निर्माण करण्याची स्पर्धाच जणू निर्माण झाली.

सर्वसाधारण समाज गेल्या ५० वर्षांत फारसा पुढारला नाही म्हणजेच त्याची मनोरचना – Mind Set दुय्यम नागरिकाच्या, शासित, अवलंबित भूमिकेतून वर यायला खूपच त्रास होतोय. "तू सैन्यात जाऊ नको" "तू हे क्रीडाक्षेत्रातील साहस करू नकोस", "परदेशात जाऊ नकोस", "सागरी नोकरीत जाऊ नकोस" अशा विविध नकारात्मक भूमिका पारंपारिक पध्दतीने घेणाऱ्या मातांची संख्या आजही कमी नाही. पण म्हणून "मी हे करणारच" "तू हे करून दाखवच" असे म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांचे पेवच जणू फुटले संघ कार्याच्या शिकवणुकीतून !

परिवर्तनवादी समाजात अशा उपक्रमवादी कार्यकर्त्यांच्या साहसी भूमिकेतून आज अनेक क्षेत्रात नवनवीन आदर्श निर्माण होत आहेत.

सुरूवातीला तंत्रशिक्षण क्षेत्रातील विकासामधून बाहेर पडलेल्या तंत्रवैज्ञानिक पदवीधरांना या देशात फारसे आव्हान ज्यांना दिसले नाही ते तरूण नावीन्याच्या शोधात परदेशात गेले. Brain Drain म्हणून आपण ते संकट म्हणून पाहिले. पण नियतीची ज्ञानेश्वरांच्या संकल्पाची प्रेरणाच जणू वेगळी होती. आज याच परदेशात गेलेल्या भारतीयांनी कॉम्प्युटर व माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्रात उभे केलेले कार्य जगातील आश्चर्य बनून राहिले आहे. म्हणजे युरोप–अमेरिकेतील तंत्र वैज्ञानिक क्रांतीच्या नंतर जवळ जवळ चारशे वर्षांनी भारतीयांनी झेप घेऊन संगणकाच्या क्षेत्रात बरोबरीची प्रगति साधण्याची किमया करून दाखविली.

***